NAAC Accredited-2015
B Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# कौशल्य विकास केंद्र

## कौशल्य विकास केंद्राची ओळख

**१. प्रस्तावना -**

सोलापूर विद्यापीठाची स्थापना १ ऑगस्ट २००४ रोजी झाली. विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर विद्यार्थ्यांना व समाजातील इच्छुक नागरिकांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सोलापूर विद्यापीठामध्ये २००५-०६ साली जनविकास केंद्राची सुरूवात झाली. याच केंद्राचे दि. २० एप्रिल २०१७ रोजी विद्यापरिषदेच्या बैठकीतील विषय क्र. ४३ (१) नुसार नाव बदलून कौशल्य विकास केंद्र असे नामांकन करण्यात आले. या कौशल्य विकास केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना, तसेच शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर गेले त्या परंतु इच्छुक विद्यार्थ्यांच्या कौशल्यात वाढ व्हावी, म्हणून केंद्रामार्फत विविध अभ्यासक्रम चालविले जातात.

२१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकामध्ये झपाट्याने बदलत चाललेल्या अर्थव्यवस्था व औद्योगिक क्षेत्रामध्ये कुशल अशा मनुष्यबळाची अत्यंत गरज आहे. म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार कौशल्य संपादित करता यावे म्हणून ६ महिने व १ वर्षाच्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. या कोर्सच्या माध्यमातून केवळ कौशल्याधारित शिक्षण देणे एवढाच हेतू मर्यादित नसून संपादित केलेल्या कौशल्याचा उपयोग करून विद्यार्थ्याने स्वत: उद्योग, व्यवसाय किंवा कौशल्याधारित सेवा पुरवणे हे उद्दिष्टे ठेवले आहे.

**२. उद्दिष्टे -**

१) विद्यार्थ्यांचा पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित प्रशिक्षण देणे.

२) बदलत्या काळानुसार कौशल्याधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून कुशल मनुष्यबळ निर्माण करणे.

३) विद्यापीठ व उद्योगक्षेत्र यांच्यात परस्पर गरजेनुसार सहसंबंध प्रस्थापीत करणे.

४) समाजातील वंचित, उपेक्षित व महिला वर्गास प्रशिक्षण देऊन स्वयंसिध्द बनवणे.

५) सलग्नित महाविद्यालयाबरोबरच विविध नोंदणीकृत संस्था/उद्योगक्षेत्र यांच्याशी संलग्नता प्रस्थापित करून विद्यापीठ व समाज संबंध दृढ करणे.

३. **स्वरूप -**

कौशल्य विकास केंद्रातील अभ्यासक्रमाचे अध्यापन व प्रशिक्षण दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हावे याकरीता कौशल्य विकास केंद्राने विशेष दक्षता घेतली आहे. केंद्राशी निगडीत सर्व अभ्यासक्रम लेखी व प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष उदयोगाशी संलग्नीत प्रशिक्षण (Internship) यानुसार चालविले जाते. प्रशिक्षण देण्यासाठी संलग्नीत असलेल्या महाविद्यालय व संस्थामध्ये कुशल व पात्र असे शिक्षक व प्रशिक्षक नियुक्त करण्यात येते.

प्रशिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाचा (Practical) अनुभव घेता यावा म्हणून संलग्नीत संस्थेमध्ये अभ्यासक्रमाशी निगडीत अदयावत अशी प्रयोगशाळा, कार्यशाळा, ग्रंथालय, सेमीनार हॉल उपलब्ध करून दिले जातात.

कौशल्य विकास केंद्र मध्ये प्रमाणपत्र व पदवीका अभ्यासक्रम चालवीले जातात, प्रमाणपत्र व पदवीका अभ्यासक्रमाकरीता किमान ३ व कमाल ६ पेपर असणे आवश्यक असतील. अभ्यासक्रमाचे प्रत्येक पेपरचे एका सत्राकरीता ४० तासीका होणे आवश्यक असेल. या पेपर पैकी किमान ५०% पेपर हे प्रात्यक्षिक स्परूपाचे राहतील.